गोदातीर 25/06/2024

# एकोणवीस वर्षांपासून फरार आरोपीच्या सोनखेड पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**लोहा** – सोनखेड पोलीस ठाणे हद्दीअंतर्गत आंबेसांगवी टोल नाक्यावर दरोडा टाकून रक्कम चोरून नेली होती. त्या गुन्ह्यात हवा असलेला व एकोणवीस वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीच्या सोनखेड पोलिसांनी सापळा रचून मुसक्या आवळल्या.



सोनखेड पोलीस ठाणे हद्दीअंतर्गत लोहा तालुक्यातील आंबेसांगवी मुख्य मार्गावरील पथकर नाक्यावर (टोल नाका) २००५ मध्ये एकूण आठ दरोडेखोरांनी दरोडा टाकून ७० हजार रुपये रोख चोरून नेले होते. त्यानुसार त्यांच्यावर सोनखेड पोलिसात कलम ३९५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मागील १९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी सुभाष विक्रम उर्फ टिकाराम राठोड (वय ३८) रा. चिकाळा तांडा (मोठा) ता. मुदखेड यास जिल्हा पोलीस अधीक्षक, इतवारा उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या आदेशाने सोनखेडचे सपोनि पांडूरंग माने यांच्या नेतृत्वाखाली रमेश वाघमारे, काळे, देवकते व मुदखेड पोलीस ठाण्याचे शिंदे यांच्या पोलीस पथकाने गोपनीय माहिती आधारे सापळा रचून रविवार, दि. २३ जून रोजी ताब्यात घेतले.